सहकारी साखर कारखान्याकडील स्थापत्य स्वरूपाची कामे --

कारखाना व आर्कीटेक्ट यांची अंतीम देयका संबंधी जबाबदारी ---

## प रि पत्र क

सध्या सर्व साधारणपणे नवीन सहकारी साखर कारखान्यांचे उभारणी, काही विस्तारीकरण, वाढीव कामे इत्यादी स्थापत्य स्वरूपाची कामे प्रगतीशील आहेत तर काही कारखान्याकडील स्थापत्य स्वरूपाची कामे पूर्णत्वाचे मार्गावर आहेत. सदर स्थापत्य स्वरूपाचे कामाचे बाबतीत खालील बाबी या कार्यालयाचे दृष्टोत्पत्तीस आल्या आहेत.

१] स्थापत्य स्वरूपाची अंदाजपत्रके तयार करणे पासून त्यास मंजुरी घेणे, निविदा बोलाविणे, निविदा समितीच्या बैठकीस हजर राहणे, कामांची आखणी करणे, कामे योग्य त्या मानका प्रमाणे होत आहेत हे पहाणे, जादा कामे, बदल कामे व जादा बाबीं यांचे दरास वेळीच मंजूरी घेणे, कामाची मोजमापे वेळीच पडताळणे, देयके पडताळणे व अंतीम देयक वेळीच तयार करून ते पडताळून आवश्यक त्या, त्या सोबत लागणाऱ्या कागद पत्रांची वेळीच पुर्तता करून त्यास या कार्यालयाची मंजूरी घेणे व वेळीच ठेकेदारांचे देयक अदा करणे या बाबतची जबाबदारी मुख्यत: आर्कीटेक्ट यांची आहे त्या बाबत या कार्यालयाने वेळोवेळी निरनिराळ्या परिपत्रकाव्दारे सुचना पारीत केल्या असून सुध्दा त्या प्रमाणे प्रत्यक्ष आवश्यक ती कार्यवाही केली जात नाही. तरी कारखान्यांनी आर्कीटेक्ट यांचेशी करार करते वेळी वरील प्रमाणे कार्यवाही करणेसाठी या कार्यालयाने काढलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाही करणे आर्कीटेक्ट यांचेवर बंधनकारक राहिल असे नमूद करावे.

२] तसेच एखादा स्थापत्य स्वरूपाचे काम पूर्ण झाले नंतर तीन महिन्याचे आत त्या कामाचे अंतीम देयक मोजमाप पुस्तकांतील नोंदीचे आधारे तयार करून त्या सोबत तयार कराव्या लागणाऱ्या संबंधीत सर्व कागदपत्रांची पुर्तता करून सदर अंतीम देयकाची पडताळणी करून कारखान्याचे आर्कीटेक्ट यांनी अंतीम मंजुरीसाठी या कार्यालयास विनाविलंब सादर करून त्यास या कार्यालयाची मंजूरी घ्यावी. तसे केल्याने ठेकेदारांना जादा रक्कम अदा होणेचे किंवा अंतिम देयक अदा न करणे बाबत ठेकेदारांचे कडून तक्रारी टाळणे शक्य होईल. अंतीम देयकास या कार्यालयाची मंजूरी मिळे पर्यन्त आर्कीटेक्ट यांच्या "फी" पैकी ५% रक्कम रोखून ठेवावी. मात्र या बरोबरच काम पूर्ण झाले नंतर त्याचे वेळीच अंतीम देयक तयार करणेची जबाबदारी कार्यकारी संचालक यांची आहे हे जाणीवपूर्वक ध्यानात घ्यावे, अन्यथा सदर बाबतीत आर्कीटेक्ट यांचेकडून कारखाना टाळाटाळ करित आहे, असा अभिप्राय प्राप्त झाला तर ते कडक कारवाईस पात्र ठरतील याची विशेष नोंद घ्यावी.

तरी स्थापत्य स्वरूपाच्या कामाच्या संदर्भात आर्कीटेक्ट यांचे बरोबर करारनामा करते वेळीच त्यामध्ये वरील परिच्छेदात नमूद केल्या प्रमाणे [illegible]

-२-

दोन्ही अटी समाविष्ट करणे बाबत विशेष दक्षता घ्यावी. तसेच सध्या चालू असलेल्या कामा बाबतही अशाच प्रकारची कार्यवाही करावी व पुर्तता अहवाल सादर करावा.

कृपया वरील परिपत्रकाची पोंच द्यावी.

जा.क्र. साआ/क-१५/न. खाने/स्थाकामे/
अंतीम देयके/९६ [१८००]
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४२. दिनांक २३, एप्रिल, १९९६.

राजीव अग्रवाल
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४२.

प्रति,

मा. कार्यकारी संचालक

-----------------------सहकारी साखर कारखाना म. [नवीन व सर्व कारखाने]

पो. तालुका जिल्हा

प्रत:- प्रादेशिक सहसंचालक [साखर] सर्व
यांचेकडे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत:- सहनिबंधक लेखा परिक्षक [साखर],
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत:- विशेष लेखा परिक्षक वर्ग-१. [सहकारी साखर] कारखाने] यांचेकडे माहितीसाठी व वरील परिपत्रकात नमूद केले प्रमाणे कार्यवाही होत आहे हे विशेषत्वे करून पहाणेसाठी अग्रेषित.
६७८, सदाशिव पेठ हरिहर निवास बाजीराव रोड
विश्राम बागवाडा जवळ - पुणे ३०

प्रत:- आर्कीटेक्ट [सर्व] यांचेकडे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.